# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/आस्था/3107/2024-25** **दि. 12/02/2025**

ई-ऑफिस फाईल क्र. 995752 मंजूरी

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये प्रशासकीय कामकाज करणेकरीता ठेका पध्दतीने संगणक चालक तथा लिपीक पुरवठा करणेबाबतचा ठेका रद्द करणेबाबत.

संदर्भ :-
1. जा.क्र.मनपा/आस्था/265/2022-23, दि.11/05/2022 रोजीचा कार्यादेश
2. जा.क्र.मिभा/मनपा/आस्था/213/2023-24, दि.28/04/2023 रोजीचा कार्यादेश.
3. दि.07/04/2022 रोजीचा करारनामा.
4. जा.क्र.मनपा/आस्था/408/2023-24, दि.23/05/2023 रोजीची नोटीस.
5. दि.24/05/2023 रोजीचा नोटीसीचा खुलासा.
6. जा.क्र.मनपा/आस्था/2177/2023-24, दि.12/12/2023 रोजीची नोटीस.
7. जा.क्र.मनपा/आस्था/2369/2023-24, दि.02/01/2024 रोजीची नोटीस.
8. जा.क्र.मनपा/आस्था/2824/2023-24, दि.15/02/2024 रोजीची नोटीस.
9. जा.क्र.मनपा/आस्था/2936/2023-24, दि.01/03/2024 रोजीची नोटीस.
10. जा.क्र.मनपा/आस्था/3034/2023-24, दि.11/03/2024 रोजीची नोटीस.
11. जा.क्र.मनपा/आस्था/30/2023-24, दि.10/04/2024 रोजीची नोटीस.
12. जा.क्र.मनपा/आस्था/346/2023-24, दि.10/06/2024 रोजीची नोटीस.
13. जा.क्र.मनपा/आस्था/1861/2024-25, दि.13/09/2024 रोजीची नोटीस
14. जा.क्र.मनपा/आस्था/2587/2024-25, दि.12/12/2024 रोजीची नोटीस.
15. जा.क्र.मनपा/आस्था/2598/2024-25, दि.12/12/2024 रोजीची नोटीस.
16. मे.शार्प सर्व्हिसेस यांचेकडील दि.26/12/2024 रोजीचा नोटीसीचा खुलासा.
17. प्रशासकीय ठराव क्र.412, दि.05/02/2025.

**आदेश**

ज्याअर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांतर्गत ठेका पध्दतीने 105 संगणक चालक तथा लिपीक व 03 लघुलेखक मनुष्यबळ पुरवठा करण्याकरीता दि.07/04/2022 रोजी करारनामा करुन दि.11/05/2022 रोजी 03 वर्षाकरीता 105 संगणक चालक तथा लिपीक तसेच दि.28/04/2023 अन्वये 11 संगणक चालक तथा लिपीक (ठेका) पुरवठा करणेबाबत आपणास कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार आपणास 119 ठेका संगणक चालक तथा लिपीक यांचा पुरवठा करण्याकरीता काम देण्यात आले आहे.

ज्याअर्थी, करारनाम्यातील अट क्र.33 मध्ये "व्दितीय पक्षकारास कामाचा महिना संपताच कर्मचाऱ्यांच्या वेतनाची मागणी महानगरपालिकेस सादर करावी व व्दितीय पक्ष यांनी प्रत्येक महिन्यास कामगारांना वेळच्या वेळी किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा (प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेच्या आतमध्ये) करणे बंधनकारक राहिल", असे नमुद आहे.

ज्याअर्थी, दि.07/04/2022 रोजी केलेल्या करारनाम्यातील अट क्र.35 मध्ये "व्दितीय पक्षाच्या कामाबाबत अनियमितता, तक्रारी तसेच काम समाधानकारक न आढळल्यास सात दिवसाची लेखी

नोटीस देऊन व्दितीय पक्षयाने अनियमितता व तक्रारीचे निराकरण न केल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल", असे नमुद आहे. सदर तरतुदीनुसार करारनाम्यातील अट क्र.33 ची पुर्तता करणेस आपणास संदर्भिय नोटीसी अन्वये कळविण्यात आले आहे. परंतु आपण त्याची पुर्तता करणेस खालीलप्रमाणे कसुर केली आहे.

**वेतन अदा करणेस केलेल्या विलंबाचा तपशिल (कर्मचाऱ्यांच्या बँक स्टेटमेंटनुसार)**

| अ.क्र. | महिना | वेतन अदा केल्याची दिनांक | विलंबाचे दिवस |
|---|---|---|---|
| 1. | जानेवारी-2024 | दि.15/03/2024 | 43 दिवस |
| 2. | फेब्रुवारी-2024 | सदरचे वेतन आपणांकडून अदा केले नसल्याने वेतन महापालिकेकडून कर्मचाऱ्यांच्या थेट बँक खात्यावर अदा करण्यात आले आहे. | - |
| 3. | मार्च-2024 | | - |
| 4. | एप्रिल-2024 | | - |
| 5. | मे-2024 | दि.12/06/2024 | 02 दिवस |
| 6. | जुन-2024 | दि.26/07/2024 | 16 दिवस |
| 7. | जुलै-2024 | सदरचे वेतन आपणांकडून मुदतीत अदा केले नसल्याने वेतन महापालिकेकडून कर्मचाऱ्यांच्या थेट बँक खात्यावर अदा करण्यात आले आहे. | - |
| 8. | ऑगस्ट-2024 | | - |
| 9. | सप्टेंबर-2024 | | - |
| 10. | ऑक्टोबर-2024 | दि.19/12/2024 | 49 दिवस |
| 11. | नोव्हेंबर-2024 | दि.27/12/2024 | 17 दिवस |
| 12. | डिसेंबर-2024 | दि.20/01/2025 | 10 दिवस |

**किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कमी अदा केलेल्या वेतनाचा तपशिल (कर्मचाऱ्यांच्या बँक स्टेटमेंटनुसार)**

| अ.क्र. | महिना | अदा करण्यात आलेले वेतन | किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कमी अदा केलेल्या वेतनाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | जानेवारी-2024 | रु.17031/- | रु.3660/- |
| 2. | मे-2024 | रु.15,750/- | रु.4941/- |
| 3. | जुन-2024 | रु.17,031/- | रु.3660/- |
| 4. | ऑक्टोबर-2024 | रु.17031/- | रु.3660/- |

ज्याअर्थी, ठेका संगणक चालक तथा लिपीक कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत अदा करीत नसल्यामुळे आपणास वेळोवेळी नोटीस देण्यात आलेली आहे. वरील तक्त्यामधील तपशीलावरून आपण दि.07/04/2022 रोजीच्या करारनाम्यातील अट क्र.33 चा भंग केल्याचे दिसून येत आहे.

ज्याअर्थी, करारनाम्यातील अट क्र.06 मध्ये "मंजूर निविदाधारकांने मनपाच्या परवानगीविना ठेका संगणक चालक तथा लिपीक व लघुलेखक पुरवठा करण्याचे काम खंडीत केले अथवा निविदा नियम अटीचा भंग केल्यास किंवा ठेका संगणक चालक तथा लिपीक व लघुलेखक सेवा पुरवठा करणे कामी संबंधीत विभागाकडुन तक्रार आल्यास मंजूर निविदाधारक म्हणजेच द्वितीय पक्षीय (L1) यांची अनामत रक्कम किंवा तिचा काही भाग जप्त करुन, सदर काम रद्द करुन, सदरच्या कंपनीस काळया यादीत टाकण्यात येईल. व्दितीय पक्षकारास Risk and Cost चे कलम लागु असेल", असे नमुद आहे.

ज्याअर्थी, कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक वेळी उशीराने तसेच कमी अदा करणे, याबाबत संगणक चालक तथा लिपीक कर्मचारी व संबंधित विभागप्रमुख यांचेकडून वारंवार तक्रार प्राप्त होणे, कामात

अनियमितता तसेच काम समाधानकारक नसल्याचे तसेच करारनाम्यातील अट क्र.33 चा आपण भंग केल्याचे दिसून येत असून आपण सादर केलेला खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

त्याअर्थी, आपण करारनाम्यातील अट क्र.06, 33 व 35 चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. तरी या उल्लंघनाबाबत आपणाविरुध्द इतर करावयाच्या कायदेशीर कार्यवाहीचा अधिकार राखून करारनाम्यातील अट क्र.24 नुसार आपणासोबत केलेला दि.07/04/2022 चा **करारनामा रद्द करण्यात येऊन आपला ठेका रद्द करण्यात येत आहे तसेच मनपाकडे जमा असलेली आपली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येत आहे**, याची नोंद घ्यावी.

सबब आपला ठेका रद्द झालेला असल्याने दि.13/02/2025 पासून संगणक चालक तथा लिपीक कर्मचारी यांचा पुरवठा मनपास करण्यात येऊ नये.

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
मे.शार्प सर्व्हिसेस,
202, राजगीर एनेक्स, लक्ष्मीबाग,
सायन रेल्वे स्टेशन समोर, सायन (प.)
मुंबई-400 022.

प्रत माहितीस्तव :-

1. मा.आयुक्त महोदय
2. मा.अतिरिक्त आयुकत (1) व (2)
3. उप-आयुक्त (सर्व)
4. सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख
5. निवडनस्ती